# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

### क्रीडा विभाग

पुढारी | पुणे, शुक्रवार ३१ ऑगस्ट २०१८

## व्यवसाय म्हणून क्रीडा क्षेत्राकडे पाहावे

### ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

राजगुरुनगर : प्रतिनिधी

शारीरिक तंदुरुस्तीचे वाढते महत्त्व आणि विविध क्रीडाप्रकारांना मिळू लागलेली राजमान्यता या मुळे क्रीडा क्षेत्राकडे आता व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे, असे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय क्रीडादिन व हुतात्मा राजगुरु यांच्या जयंतीचे औचित्य साधून हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित मॅरेथॉन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. संजय शिंदे, प्रा. ए. बी. कानवडे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज आदी उपस्थित होते.

ॲड. बुट्टेपाटील म्हणाले, पूर्वी खेळ हे फक्त मनोरंजनाचे साधन मानले जायचे, आता ते एक चांगले करिअर बनले असून ज्यांना खेळामध्ये रुची आणि स्वतःमधील सृजनशीलतेला वाव द्यायची इच्छा आहे त्या सर्वांना क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाचे क्षेत्र खुले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यवस्थापन, प्रशिक्षण, फिजिओथेरपी, नियोजन, समालोचन अशा क्षेत्रांची ओळख करून घ्यावी. विद्यार्थ्यांसाठी ५ किलोमीटर, तर विद्यार्थिनींसाठी ३ किलोमीटर धावण्याच्या या स्पर्धेत सुमारे १४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात मुलांमध्ये अनुक्रमे पहिल्या तीनमध्ये सूरज घोगरे, दत्तात्रय शिंदे, विजय डोबळे यांनी, तर मुलींमध्ये गौरी राऊत, ऐश्वर्या खळदकर, अक्षदा वाय यांनी बाजी मारली आहे. या सर्वांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेचे आयोजन शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. आर. जी. राजळे, प्रा. एस. बी. गोरे, प्रा. वाय. बी. मोहिते यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले, तर प्रा. संतोष गावडे यांनी आभार मानले.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर.

**'परिसर स्वच्छ ठेवू, आरोग्यासाठी धावू'**

या स्पर्धेच्या निमित्ताने परिसर स्वच्छ ठेवू, आरोग्यासाठी धावू हा संदेश देण्यात आला. चांडोलीच्या ग्रामीण रुग्णालयातर्फे रुग्णवाहिका, तर खेड पोलिस ठाण्याच्या वतीने सुरक्षाव्यवस्था पुरविण्यात आली. महाविद्यालयातील जिमखाना, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून काम पाहिले.

---

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. ३१ ऑगस्ट २०१८

## मॅरेथॉन स्पर्धेत सूरज, गौरी प्रथम

राजगुरुनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरु यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत मुलांमध्ये सूरज घोगरे, तर मुलींमध्ये गौरी राऊत यांनी प्रथम क्रमांक पटकविला.

या मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. संजय शिंदे, प्रा. ए. बी. कानवडे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज उपस्थित होते. दरम्यान, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ५ तर विद्यार्थिनींसाठी ३ कि.मी. अशा दोन गटांत झालेल्या या स्पर्धेत सुमारे १४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



राजगुरुनगर : मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

### हुतामा राजगुरु जयंतीचे औचित्य

विद्यार्थ्यांमध्ये सुरज घोगरे, दत्तात्रय शिंदे, विजय डोबळे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय तर विद्यार्थिनींमध्ये प्रथम गौरी राऊत, द्वितीय ऐश्वर्या खळदकर, तृतीय क्रमांक अक्षदा वाय यांनी पटकवला. या सर्वांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.

स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. आर. जी. राजळे, प्रा. एस. बी. गोरे, प्रा. वाय. बी. मोहिते यांनी केले.

सकाळ
शुक्रवार, ३१ ऑगस्ट २०१८ | ७

# क्रीडा क्षेत्राकडे व्यवसाय म्हणून पाहा

## ॲड. बुट्टे पाटील यांचा सल्ला; राजगुरुनगरला मॅरेथॉन स्पर्धा

**राजगुरुनगर, ता. ३० :** "शारीरिक तंदुरुस्तीचे समाजात वाढणारे महत्त्व व क्रीडा प्रकारांना मिळू लागलेली राजमान्यता यामुळे क्रीडा क्षेत्राकडे व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे," असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थ्यांसाठी ५ कि.मी., तर विद्यार्थिनींसाठी ३ कि.मी. अशा दोन गटांत झालेल्या या स्पर्धेत सुमारे १४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



राजगुरुनगर (ता. खेड) : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित मॅरेथॉन स्पर्धेची सुरवात करताना देवेंद्र बुट्टे पाटील व नानासाहेब टाकळकर.

बुट्टे पाटील म्हणाले, "ज्यांना खेळण्यामध्ये रुची आणि स्वतःमधील सृजनशीलतेला वाव देण्याची इच्छा आहे, त्या सर्वांना क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाचं क्षेत्र खुले आहे. यामध्ये व्यवस्थापन, प्रशिक्षण, फिजिओथेरपी, नियोजन, समालोचन इत्यादी कार्यक्षेत्रांचा समावेश आहे."

विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक सूरज घोगरे, द्वितीय क्रमांक दत्तात्रय शिंदे, तृतीय क्रमांक विजय डोबळे यांचा, तर विद्यार्थिनींमध्ये प्रथम क्रमांक गौरी राऊत, द्वितीय क्रमांक ऐश्वर्या खळदकर, तृतीय क्रमांक अक्षदा वाघ यांनी पटकाविला. या स्पर्धेच्या निमित्ताने परिसर स्वच्छ ठेवू, आरोग्यासाठी धावू हा संदेश देण्यात आला. स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. आर. जो. राजळे, प्रा. एस. बी. गोरे, प्रा. वाय. बी. मोहिते यांनी केले.

केसरी पुणे, ९ सप्टेंबर २०१८

# व्यवसाय म्हणून क्रीडा क्षेत्राकडे पाहण्याची गरज

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** पूर्वी खेळ फक्त विरंगुळ्याचे साधन मानले जायचे. आता मात्र शारीरिक तंदुरूस्तीचे समाजात वाढणारे महत्त्व व क्रीडा प्रकारांना मिळू लागलेली राजमान्यता यामुळे क्रीडा क्षेत्राकडे व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज निर्माण झाली, असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉन स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते.

या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. संजय शिंदे, प्रा. ए. बी. कानवडे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी पाच कि.मी. तर विद्यार्थिनींसाठी ३ कि.मी. अशा दोन गटात झालेल्या या स्पर्धेत सुमारे १४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

ॲड.देवेंद्र बुट्टेपाटील पुढे बोलताना म्हणाले की, ज्यांना खेळण्यामध्ये रूची आणि स्वत:मधील सृजनशीलतेला वाव देण्याची इच्छा आहे त्या सर्वांना क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाचं क्षेत्र खुलं आहे. यामध्ये व्यवस्थापन, प्रशिक्षण, फीजिओथेरपी, नियोजन, समालोचन आदि कार्यक्षेत्रांची विद्यार्थ्यांनी ओळख करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक सुरज घोगरे, द्वितीय क्रमांक दत्तात्रय शिंदे, तृतीय क्रमांक विजय ढोबळे यांचा तर विद्यार्थिनींमध्ये प्रथम क्रमांक गौरी राऊत, द्वितीय क्रमांक ऐश्वर्या खळदकर, तृतीय क्रमांक अक्षदा वाघ यांनी पटकवला. या सर्वांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख